November-2021 (01)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,**
**भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

माहितीचा अधिकार

**जा.क्र.मनपा/आस्था/मा.अ./ 318 /2021-22** **दि.1 /11 /2021**

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 01 मा. अ.
दिनांक: 01/11/2021

प्रति,
विधी अधिकारी,
विधी विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- श्री. दिनेश कानगुडे, लिपीक यांची माहिती मिळणेबाबत.
संदर्भ :- श्री. प्रभाकर सदाशिव गायकवाड यांचा दि.28/10/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

उपरोक्त विषयान्वये श्री. प्रभाकर सदाशिव गायकवाड यांनी दि.28/10/2021 रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत अर्जानुसार श्री. दिनेश कानगुडे, लिपीक यांची माहिती अपेक्षिलेली आहे.

सदर अर्जातील माहिती आपल्या विभागाशी संबंधित असुन सदरची माहिती अर्जदारास परस्पर देऊन त्याची एक प्रत आस्थापना विभागात देण्यात यावी. (सोबत संदर्भिय अर्जाची छायांकीत प्रत जोडली आहे)

Jadhav
8/11/2021

(सुनिल यादव)
जनमाहिती अधिकारी तथा
सहा. आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
श्री. प्रभाकर सदाशिव गायकवाड,
सद्‌गुरु निवास, साईनाथ वेल्फर सोसा.,
पेणकरपाडा, निंबादेवी रोड, मिरारोड (पुर्व).

D:\Nayana\आर.टी.आय.लेटर- RTI.docx

आवक 318
28/10/2021

**जोडपत्र "अ" (नियम 3 नुसार) माहितीचा अधिकारी कायदा 2005 कलम 3 अन्वये अर्ज**

**प्रति,**

**जन माहिती अधिकारी,**
विधी विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

1) अर्जदाराचे पुर्ण नाव :- श्री. प्रभाकर गायकवाड

2) पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता :

आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :

१. श्री. दिनेश कानगुडे, लिपिक यांच्या उपसचिव पदावर नियुक्ती मिळणेबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने ॲड रामचंद्र आपटे यांच्याकडून मागविलेल्या अअभिप्रायची प्रत देण्यात यावी.

10) कोणत्या कालावधीतील माहिती आवश्यक आहे (कालावधी) :
जानेवारी 2021 ते आजपर्यंत

11) माहिती टपालाने/व्यक्तीश:
(साध्या, रजि, स्पीड पोस्टाने) :- व्यक्तीश: ✓

6) अर्जदार दारिद्रय रेषेखालील नागरिक असल्यास पुरावा झेरॉक्स प्रत जोडावी. :- निरंक

अर्जदाराची स्वाक्षरी
9967120501

ठिकाण : भाईंदर
तारीख 28/10/2021

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०१/२०२१-२२
दि. ३०/११/२०२१

प्रति,

श्री. प्रभाकर गायकवाड
सद्गुरु निवास, साईनाथ वेल्फेअर सोसायटी,
पेणकरपाडा, निंबादेवी रोड, मिरारोड पुर्व

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ :-** १) आपला दि. २८/१०/२०२१ रोजीचा अर्ज.
२) आस्थापना विभागाचे पत्र दि. ०१/११/२०२१

महोदय,

संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण लिपिक, श्री. दिनेश कानगुडे यांचा उपसचिव पदावरील नियुक्तीसाठी केलेल्या अर्जाच्या अनुशंगाने ॲड. रामचंद्र आपटे यांच्याकडून मनपाने मागितलेल्या अभिप्रायची प्रत अपेक्षिली आहे. सदरचा अर्ज विधी विभागाशी संबंधित असल्याने आस्थापना विभागाने दि. ०१/११/२०२१ रोजी सदरचा अर्ज विधी विभागास वर्ग केलेला आहे. त्याअनुशंगाने आपणास कळविण्यात येते की, केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ चे कलम ८(१)(जे) नुसार वैयक्तीक स्वरुपाची माहिती देय नाही. तरी आपण अर्जात नमुद केलेले अभिप्राय वैयक्तीक स्वरुपाचे असल्यामुळे सदर अभिप्रायची प्रत देता येणार नाही.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत श्री. मारुती गायकवाड, मा. प्रथम अपिलिय अधिकारी तथा उपायुक्त (मु), मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, तिसरा मजला यांच्याकडे प्रथम अपिल दाखल करता येईल.

Sunadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

2/12/2021

माहितीचा
अधिकार

जा.क्र.मिभामनपा/उपआ.विधी/ ९६२ /२०२१
स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१,
दुरध्वनी क्र.२८१९२८२८, २८१९३०२८
दिनांक: ०८/१२/२०२१

<u>सुनावणी दिनांक:- १४/१२/२०२१</u>
वेळ:- दुपारी १२.४० वाजता

प्रति,

श्री.प्रभाकर सदाशिव गायकवाड,
सद्‌गुरु निवार, साईनाथ वेल्फर सोसायटी,
पेणकरपाडा, निर्बादेवी रोड,
मिरारोड (पूर्व).

विषय:- <u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दाखल प्रथम अपिल</u>
संदर्भ:- आपला दि.०७/१२/२०२१ रोजीचा अपील अर्ज.
(या कार्यालयाकडे प्राप्त दि.०८/१२/२०२१, आ.क्र.१३७)

उपरोक्त संदर्भिय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये दाखल केलेला दि.०७/१२/२०२१ रोजीचा अपिल अर्ज दि.०८/१२/२०२१ रोजी इकडील कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर संदर्भाधिन प्रथम अपिलाची सुनावणी, खाली दिलेल्या नमुद दिवशी/वेळी आयोजित करण्यात आलेली असुन सुनावणीस आपण उपस्थित रहावे.

सुनावणीचा दिनांक व वेळ :- दि.१४/१२/२०२१ रोजी दुपारी १२.४० वाजता.
ठिकाण :- प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी) यांचे दालन,
चौथा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (प.). ता.जि.ठाणे ४०११०१.

(मारुती गायकवाड)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (विधी)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत:- जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका, यांना सुनावणीचे दिवशी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहणेकामी
(सोबत श्री.प्रभाकर सदाशिव गायकवाड यांच्या संदर्भिय अर्जाची छायांकित प्रत)

उपायुक्त (मु.)
आ.क्र.... 936
दिनांक ...08/12/21

(जोडपत्र (ब))

(नियम-५(१))

<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम-१९(१)-अन्वये प्रथम अपील</u>

प्रति,
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त साहेब
मुख्यालय मिरा भाईंदर महानगरपालिक भाईंदर (प)

1) अर्जदाराचे पुर्ण नाव :- श्री.प्रभाकर सदाशिव गायकवाड

2) पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता :- सदगुरू निवार साईनाथ वेल्फर सोसायटी, पेणकरपाडा,निंबादेवी रोड मिरा रोड पुर्व.

3) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल :- श्री.दिनेश कानुगडे यांनी केलेल्या अर्जाच्या अनुशंगाने सिनियर कॉन्सील श्री. रामचंद्र आपटे यांनी दिलेल्या अभिप्रायाची छायाकित प्रत मिळणे बाबत.

4) कोणत्या कालावधीतील माहिती आवश्यक आहे (कालावधी) सन 2020-21

5) माहिती टपालाने/व्यक्तिश :- (साध्या, रजि, स्पीड पोष्टाने) :- व्यक्तिश

6) अर्जदार दारिद्रय रेषेखालील नागरिक असल्यास पुरावा झेरॉक्स प्रत जोडावी. निरंक

ठिकाण :- पेणकरपाडा

दिनांक :- 07/12/2021

अर्जदाराची स्वाक्षरी

(श्री.प्रभाकर सदाशिव गायकवाड)

9967120501

माहितीचा अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.

जा.क्र.माअधि/अपिल/१३७/२०२१
दि.१४/१२/२०२१.

मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र....01.....मा.अ.(प्रथम अपील)
दिनांक: 15/12/2021

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.प्रभाकर सदाशिव गायकवाड, ................अपिलार्थी
सद्‌गुरु निवार, साईनाथ वेल्फर सोसायटी,
पेणकरपाडा, निर्बादेवी रोड,
मिरारोड (पूर्व).

श्रीम.सई वडके, ................प्रतिवाद
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी,
विधी विभाग.

## -: विवेचन :-

श्री.प्रभाकर सदाशिव गायकवाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांचेकडे **"श्री.दिनेश कानगुडे यांनी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सिनियर कॉन्सिल श्री.रामचंद्र आपटे यांनी दिलेल्या अभिप्रायाची छायांकित प्रत"** मिळणेबाबत दि.२८/१०/२०२१ रोजी अर्ज सादर केला.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांनी माहिती दिली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.०७/१२/२०२१ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (विधी) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**
अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१४/१२/२०२१ रोजी दुपारी १२.४० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.विधी/ १७२/२०२१ दि.०८/१२/२०२१ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग व अपिलार्थी अर्जदार हे सुनावणीस उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** दि.२८/१०/२०२१ रोजी केलेल्या माहिती अधिकार अर्जानुसार माहिती मिळाली नाही.

**<u>जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>**
अपिलार्थी अर्जदारास दि.३०/११/२०२१ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

-: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी, विधी विभाग यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिल्याने सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(मारुती गायकवाड)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (विधी)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.प्रभाकर सदाशिव गायकवाड,
सद्‌गुरु निवार, साईनाथ वेल्फर सोसायटी,
पेणकरपाडा, निर्बादेवी रोड,
मिरारोड (पूर्व).

२) जनमाहिती अधिकारी तथा
विधी अधिकारी, विधी विभाग.

३) माहिती अधिकार अपिल नस्ती प्रथम अपिलीय अधिकारी
तथा उपायुक्त (विधी) यांचे कार्यालय.